




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार १९ ऑक्टोबर २०२४ | अंक ३१३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# सागर बंगला आणि वाय बी चव्हाण सेंटर बनलं तिकीट केंद्र, कोणी कोणी घेतली भेट?

**बीड प्रतिनिधी :- गोकुळ इंगोले**

महायुतीच्या जागा वाटपाचा तिढा अमित शाह सोडवणार आहेत. त्यासाठी मुख्यमंत्री शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री दिल्लीत दाखल झालेत. रखडलेल्या 43 जागांचं वाटप अमित शाह करणार आहेत. महायुतीत जागा वाटपावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे आणि अजित पवार दिल्लीत आलेत. मुख्यमंत्री शिंदेही दिल्लीत येणार असून अमित शाहांच्या उपस्थितीत तोडगा निघणार आहेत. महायुतीत 288 पैकी 245 जागांवर आतापर्यंत तोडगा निघालाय. आता 43 जागांचं वाटप अमित शाहांच्या उपस्थितीत होणार आहे.

भाजप 155-160 जागांवर लढण्यास ठाम असल्याची माहिती आहे. दुसऱ्या नंबरवर शिंदेंची शिवसेना राहू शकते, शिंदेंच्या शिवसेनेला 70-75 जागा मिळू शकतात आणि जागा वाटपात अजित पवारांची राष्ट्रवादी 3 नंबरवर राहू शकते. दादांच्या वाट्याला 55-60 जागा मिळू शकतात.



तर मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यावरुन रोहित पवारांनी मुख्यमंत्री शिंदेसह फडणवीसांनाही डिवचलंय. शिंदेंचा चेहरा निवडणुकीपुरताच राहिल आणि फडणवीसांना चेहरा केल्यास 20-30 जागांचं नुकसान होण्याची भीती अमित शाहांना असल्याची टीका रोहित पवारांनी केली आहे. दुसरीकडे तिकीटासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शरद पवारांकडे इच्छुक नेत्यांची रीघ लागली. सध्या सागर बंगला आणि वाय बी चव्हाण सेंटर तिकीट केंद्र झाली आहेत. शिवाजी पाटलांनी फडणवीसांची भेट घेतली. शिवाजी पाटील माथाडी कामगार संघटनेचे उपाध्यक्ष आहेत. चंदगड विधानसभेतून ते इच्छुक आहेत. पण ही जागा अजित पवारांच्या राष्ट्रवादीची असून सध्या राजेश पाटील आमदार आहेत.राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिकांनी फडणवीसांची भेट घेतली. कोल्हापूर उत्तर मतदारसंघातून मुलगा कृष्णराज महाडिकांना तिकीट मिळावं यासाठी फिल्डिंग लावली आहे. पण जागा शिंदेंच्या शिवसेनेकडे आहे आणि राजेश क्षीरसागरांनी तयारी केली आहे.रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोतही फडणवीसांच्या भेटीला आले. वाळवा मतदारसंघातून स्वत: सदाभाऊ लढण्यासाठी इच्छुक आहेत. या जागेवर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा दावा आहे. रणजीत पाटील यांनीही सागर बंगल्यावर फडणवीसांची भेट घेतली. अमरावती पदवीधर मतदारसंघात पराभव झाला होता. आणि अकोला पूर्व मधून विधानसभा लढण्यास रणजीत पाटील इच्छुक आहेत.

माजी खासदार संजय काका पाटीलही फडणवीसांना भेटले. याआधी तासगाव कवठे महांकाळमधून तिकीटासाठी संजय काका अजित पवारांनाही भेटलेत. ही जागा अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे असल्यानं भाजपला मिळावी म्हणून प्रयत्नशील आहेत. नारायण राणेंनीही फडणवीसांची भेट घेतली. कुडाळ मालवण मतदारसंघातून मुलगा नितेश राणे इच्छुक आहेत. मात्र मतदारसंघ शिंदेंच्या शिवसेनेकडे असल्यानं कोणाला सुटणार यावरुन सस्पेंस आहे. वर्सोव्याच्या आमदार भारती लव्हेकरांनीही फडणवीसांची भेट घेतली. लव्हेकरांचं तिकीट कापलं जाण्याची शक्यता आहे, त्यामुळं त्यांनी फडणवीसांची भेट घेतली. माजी खासदार राजेंद्र गावित पालघर विधानसभा मतदारसंघातून इच्छुक आहेत..लोकसभेत डावलल्यानं आता विधानसभेत तिकीटाची मागणी राजेंद्र गावितांची आहे. इकडे शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडेही दादा आणि शिंदेंचे नेते तिकीट मागण्यासाठी आले.

## बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात नवी अपडेट, पोलिसांच्या चौकशीत नवा खुलासा



**दैनिक लोकआरंभ//**

माजी मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दीकी (Baba Siddique) यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी आज आणखी 5 आरोपींना अटक केलीये. नितीन सप्रे, रामफुलचंद कनोजिया, संभाजी किशोर पारधी, प्रदीप दत्तू ठोंबरे, चेतन पारधी अशा या आरोपींची नावे आहेत. ज्यांना वेगवेगळ्या ठिकाणाहून अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी माहिती दिली की, नितीन सप्रे आणि राम कनोजिया हे मुख्य आरोपी आहेत. या आरोपींनी शूटर्सना तीन शस्त्रे दिली होती. पोलिसांनी ही शस्त्रे आधीच जप्त केली आहेत. सप्टेंबरमध्ये हे दोन शूटर कर्जतमध्ये दोन मुख्य आरोपींसोबत थांबले होते. आरोपींनी या शूटर्सना काही पैसेही देखील दिले होते. आरोपींनी शस्त्रे कसे वापरायचे याचा सराव कुठे केला याचा शोध आता पोलीस घेत आहेत.

पोलिसांनी माहिती दिली की, आरोपी नितीन सप्रे याला डोंबिवलीतून, रामफुलचंद कनोजियाला पनवेलमधून, संभाजी किशोर पारधी, प्रदीप दत्तू ठोंबरे आणि चेतन पारधी यांना अंबरनाथमधून अटक करण्यात आली आहे. नितीन सप्रे हा मुख्य सूत्रधार असून तो शुभम लोणकरच्या संपर्कात होता. तर शिवकुमार आणि धर्मराज कुर्ल्यातील भाड्याच्या घरात जाण्यापूर्वी कर्जतमध्ये एका खोलीत राहिले होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांना खोट्या अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्यात जामीन मंजूर



परळी (वार्ताहर) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांना खोट्या अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्यात जामीन मंजूर झाला आहे. जलालपूर भागातील साबळे कुटुंबासोबत वाद झाला होता या प्रकरणाशी कसलाही संबंध नसणारे व ज्या वेळेला हे प्रकरण घडले त्यावेळी परळी पासून 40 किलोमीटर अंतरावर पक्षाच्या शेतकरी संवाद यात्रेत सहभागी असलेले परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांच्यावर राजकीय द्वेषातून दहशतवाद माजवणाऱ्या प्रस्थापित राजकीय पुढाऱ्यांनी पोलिसांना हाताशी धरून खोटा अ‍ॅट्रॉसिटी गुन्हा दाखल केला होता. त्या गुन्ह्यातून अंबाजोगाई सेशन कोर्टाने तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांना शुक्रवार दि 18 ऑक्टोबर 2024 रोजी अंतरीम जामीन मंजूर केला आहे. परळी वैद्यनाथ येथे गुंडागर्दी, दहशतवाद, अन्याय, अत्याचाराचे अनेक प्रकरण घडत असतांना मागच्या काही वर्षांमध्ये विनाकारण खोटे गुन्हे दाखल करून परळीतील सर्वसामान्य लोकांसाठी आवाज उठवणाऱ्या अनेक लोकांवर खोटे गुन्हे दाखल केले जात असून याचाच भाग म्हणजे मागच्या काही वर्षापासून सर्वसामान्य लोकांसाठी आवाज उठवणारे गोरगरिबांचे कैवारी परळीचे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांच्यावर राजकीय द्वेषातून खोटा गुन्हा दाखल करण्यात आला होता.हा गुन्हा पूर्णपणे खोटा असून याचे सर्व पुरावे लुगडे महाराजांकडे होते त्यामुळे त्यांना जामीन मंजूर झाला कोर्टामध्ये देवराव लुगडे महाराज यांच्या वतीने अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध विधीज्ञ अ‍ॅड अजित बापू लोमटे यांनी बाजू मांडली.

## सोयाबीनची हमीभावाने खरेदी तात्काळ चालु करुन २४ तासाच्या आत पैसे शेतकऱ्यांना द्या नसता तिव्र आंदोलन – भाई विष्णुपंत घोलप



पाटोदा (प्रतिनिधी) नवीन सोयाबीनची आवक एक महिन्यापासून बाजारात येत आहे. सोयाबिनचा शासनाचा हमीभाव 4892 रुपये आहे आज बाजारात सोयीबीनची खरेदी 3500 ते 4200 रुपये असुन यामुळे शेतकरी वर्गाला 1 क्विंटलच्या मागे किमान 1 हजार रुपयाचे नुकसान सोसावे लागत आहे.शासनाने 15 ऑक्टोबर 2024 ला खरेदी केंद्र चालु करु म्हणून घोषणा केलेली असुन आता शेतकऱ्यांची सोयाबीन नोंदणी चालु केलेली आहे. शासनाने शेतकऱ्याचा विचार न करता सोयाबीन प्लांट (कंपनी) चा विचार केलेला असुन सोया तेल आणि सोया पेंड कंपनीला हजार रुपयाच्या फरकाने सोयाबीन कमी भावात मिळत आहे.

तसेच शेतकऱ्यांची सोयाबीन हमीभावाने खरेदी केल्यानंतर किमान 24 तासाच्या आत पैसे शेतकऱ्यांना मिळावेत,शेतकऱ्यांना सोयाबीन तयार करतांना बियाणे,रासायनिक खते, ट्रॅक्टरचा खर्च,खुरपणी किंवा डुबे चालविणे,फवारणी,काढणी व मळणी याला रोख पैसे द्यावे लागत आहे. त्यासाठी शासनाने सोयाबीनचे हमी भावाने खरेदी केंद्र तात्काळ चालु करुन 24 तासाच्या आत शेतकऱ्यांना पैसे द्यावेत नसता भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाखाली शेतकरी तिव्र आंदोलन करतील याची शासनाने गांर्भीयाने नोंद घ्यावी असे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना कळविले आहे. माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री मुंडे व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदास मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना कळविले आहे.

# आमदार प्रकाश दादा सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके हे कायम ओबीसीच्या पाठीशी – अ‍ॅड.आनंद काळे

## – बदनामी करणाऱ्यांची आता गय करणार नाही – अ‍ॅड काळे



**वडवणी, बीड प्रतिनिधी, अंकुश गवळी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके व युवकांचे हृदयस्थान जयसिंग भैय्या सोळंके हे कायम ओबीसीच्या हितासाठी तत्पर राहिले आहेत. आ प्रकाश दादा सोळंके आणि जयसिंग भैय्या सोळंके यांची जाणीवपूर्वक बदनामी करण्याचे षडयंत्र काहीजण रचत असून अशा षडयंत्राला समाजबांधवांनी बळी पडू नये.आमदार प्रकाश सोळंके व जयसिंग सोळंके हे सदैव ओबीसी समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहात असल्याचे मत अ‍ॅड.आनंद काळे यांनी व्यक्त केले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचे वातावरण निर्माण झाले आहे.गावागावात अनेक जण संवाद दौरे काढत आहेत. या जन संवाद दौऱ्याच्या निमित्ताने अनेक इच्छुक आपल्या हितासाठी वेगवेगळ्या चाली खेळत असून या गाव भेटी दौऱ्याच्या निमित्ताने आमचे नेते आमदार प्रकाश दादा सोळंके व समस्त युवकांचे हृदय स्थान जयसिंग भैय्या सोळंके यांची बदनामी करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू केले जात आहे. प्रत्यक्षात मी ओबीसी समाजातील आहे. आजवर ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी आपण तालुका स्तरावर व गावागावात सर्व समाजाला एकत्र करून लढा उभारला आहे. या ओबीसी समाजाच्या हितासाठी आ प्रकाश सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके यांनी सहभाग घेऊन खंबीर साथ दिली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना अद्याप पर्यंत त्यांनी कधीही दुजाभाव केलेला नाही. प्रत्येक वेळी महत्त्वाच्या चर्चे दरम्यान माझ्यासारख्या ओबीसी कार्यकर्त्याला प्राधान्य देऊन त्यांनी सदैव विविध विकासात्मक निर्णयात महत्त्वाचे स्थान दिले आहे. मात्र आमच्यातीलच काही दुष्ट प्रवृत्तीचे लोक आमदार प्रकाश दादा सोळंके व जयसिंग भैया सोळंके यांना बदनाम करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. आपण माजलगाव विधानसभा मतदारसंघातील ओबीसी समाज बांधवांना नम्रपणे आव्हान करतो की कोणीही अशा भुलथापांना बळी पडू नये.प्रकाश दादा सोळंके हे सर्वसामावेशक नेतृत्व आहेत. जयसिंग भैय्या सोळंके देखील तमाम युवकांचे हृदय स्थान आहेत. या दोघांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये कधीही जातिवाद केला नाही. त्यांना सर्व समाज बांधवांच्या विषयी आदर असल्याचे आपण सर्वांनी पाहिले असून यापुढे मात्र त्यांची बदनामी करणाऱ्यांची गय केली जाणार नाही असे रोखठोक मत अ‍ॅड.आनंद काळे यांनी व्यक्त केले



## दारिद्र्यः एक गुंतागुंतीची समस्या!

दारिद्र्याचे बहुआयामी दुष्टचक्र देशभरातील गरिबीची वाढती लोकसंख्या, जातीवाद, श्रीमंत आणि गरीब वाढती आर्थिक दरी, बेभरवशाची शेती, भ्रष्टाचार, पुराणमतवादी विचार, बेरोजगारी, निरक्षरता आणि वेगवेगळ्या साथीच्या रोगाचा फैलाव आदी प्रमुख कारणे असली तरी वाढता उपभोगवाद, चंगळवाद आणि अपुरा रोजगार यामुळेच अधिक विषमता आणि अधिक दारिद्र्य असे एक दुष्टचक्र निर्माण झालेले दिसते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टानुसार लोकांना विशिष्ट निवडीमुळे नव्हे तर अन्न, घर, जमीन, आरोग्य या कारणांमुळे गरिबीत जीवन जगण्यास भाग पाडले जाते. वाचनीय व चिंतनीय लेख श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींच्या सुंदर शब्दशैलीत... संपादक.

आजही जगातील ८ ते १० टक्के लोक प्रतिदिवस १.९० डॉलरपेक्षा कमी उत्पन्नावर उदरनिर्वाह करतात. तर भारतातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ३६ कोटी लोक मुलभूत सोयीसुविधांपासून वंचित आहेत. या पार्श्वभूमीवर सकल अर्थव्यवस्थेच्या सदृढ वाढीसह अर्थव्यवस्थेचा फायदा वंचित समाजापर्यंत पोचेल, शिक्षण, आरोग्य आणि दरडोई उत्पन्न सुधारून अधिकाधिक नागरिकांना दारिद्र्यरेषेच्या परिघाबाहेर कसे आणता येईल, याद्दष्टीने चिंतन होणे आवश्यक आहे. जागतिक बहुआयामी दारिद्र्य स्थिती गरिबी मोजण्यासाठी केवळ उत्पन्न हा निकष महत्त्वाचा नसून पोषण, बालमृत्यू, शालेय शिक्षण, शाळेची उपस्थिती, स्वयंपाक इंधन, स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज, गृहनिर्माण व घरगुती मालमत्ता अशा १० निकषांच्या आधारे गणना केली जाते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या २०२०च्या जागतिक बहुआयामी गरीबी निर्देशांक-एमपीआय अनुसार १०७ विकसनशील देशांमधील सुमारे १.३ अब्ज लोक दारिद्र्यामध्ये असल्याचे दिसते. त्यामध्ये जवळपास ५५८ दशलक्ष लोक उप-सहारा आफ्रिकेतील आणि ५३० दशलक्ष दक्षिण आशियामधील आहेत. ६७ टक्के लोक मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमधील आहेत. जगभरातुनच दारिद्र्य निर्मूलनाचे प्रयत्न सुरू आहेत. पण अजुनही बऱ्याच देशांमध्ये मुलभूत सोयीसुविधांची कमतरता आहे. यामध्ये प्रामुख्याने उपासमार, आरोग्य सेवा, पौष्टिक अन्नाची कमतरता, असुरक्षित घरे, सामाजिक अवहेलना, धोकादायक कामाची परिस्थिती, असमान संधी आणि मर्यादित राजकीय प्रवेश आदी संकटांना सामोरे जावे लागते. जगातील कोट्यवधी लोक अत्यंत गरीबीने जगत आहेत. जागतिक पातळीवर उत्पन्न असमानता वाढत असून गत काही वर्षात अब्जाधिशांच्या संपत्तीत १२ टक्क्यांनी वाढ तर गरीबांच्या संपत्तीत ११ टक्क्यांची घट झाली आहे. यामुळे शाश्वत विकासासाठीच्या २०३०च्या अजेंड्यानुसार सर्वसमावेशक, शाश्वत आणि न्याय्य आर्थिक वाढीसाठी पूर्णपणे गरिबी उच्चाटनाचे आव्हान कायम आहे.

विषमताविरहीत विकासाचे आव्हान देशात गेल्या कित्येक दशकांपासून सरकारचा गरिबी निर्मुलनाचा प्रयत्न सुरू आहे. बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये देशातील अर्ध्याहून जास्त गरीब जनता आहे तर दिल्ली, केरळ आणि गोवा या राज्यांमध्ये गरिबीचे प्रमाण सर्वात कमी आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या २०२० च्या जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकानुसार देशाने दारिद्र्य-निर्मूलनाच्या दरात गेल्या दहा वर्षात लक्षणीय प्रगती केली, ही बाब स्वागतार्ह ठरते. मात्र आरोग्य ही देशातील अजूनही एक मोठी समस्या असून अनेक खेडी सक्षम अशा आरोग्य सोयीसुविधांपासून वंचितच आहेत. दुर्दैवाची बाब अशी की, सरकारकडून शिक्षण, आरोग्य यासारख्या मुलभूत सोयीसुविधांवर केल्या जाणाऱ्या खर्चाचा लाभ फार थोड्या लोकांपर्यंत पोचतो. वर्ल्ड बँकेचे माजी संशोधन संचालक मार्टिन रॅवालियन यांनी म्हटल्याप्रमाणे गरिबी निर्मूलन करून सामाजिक सुधारणा करण्याच्या मार्गातलं सर्वात मोठं आव्हान आहे, ते वाढत्या विषमतेचं! एकीकडे विकास धोरणं सर्वांत जास्त गरीब असणाऱ्यांकडे पुरेशी पोचत नसल्याची वस्तुस्थिती आहे तर दुसरीकडे असमान संपत्ती वितरणामुळेही सामाजिक समावेशकतेला अडथळा निर्माण होतो आहे. त्यामुळे निती आयोगाच्या २०१९ च्या शाश्वत विकास अहवालानुसार गरीबी उपासमार आणि आर्थिक असमानता वाढल्याचे स्पष्टपणे दिसते आहे. कारण देशभरातील १० टक्के श्रीमंताकडे देशातील एकूण संपत्तीच्या ७७.४ टक्के संपत्ती आहे तर उर्वरित बहुसंख्य लोकांना रोजीरोटीचा प्रश्न भेडसावतोय. ऑक्सफॅम या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या रिवार्ड वर्क, नॉट वेल्थ या अहवालामध्ये २०१८ ते २०२२ या काळात देशात अब्जाधिशांच्या संख्येत तब्बल ७० टक्क्यांनी वाढ होईल, असा अंदाज आहे. दारिद्र्याचे बहुआयामी दुष्टचक्र देशभरातील गरिबीची वाढती लोकसंख्या, जातीवाद, श्रीमंत आणि गरीब वाढती आर्थिक दरी, बेभरवशाची शेती, भ्रष्टाचार, पुराणमतवादी विचार, बेरोजगारी, निरक्षरता आणि वेगवेगळ्या साथीच्या रोगाचा फैलाव आदी प्रमुख कारणे असली तरी वाढता उपभोगवाद, चंगळवाद आणि अपुरा रोजगार यामुळेच अधिक विषमता आणि अधिक दारिद्र्य असे एक दुष्टचक्र निर्माण झालेले दिसते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टानुसार लोकांना विशिष्ट निवडीमुळे नव्हे तर अन्न, घर, जमीन, आरोग्य या कारणांमुळे गरिबीत जीवन जगण्यास भाग पाडले जाते. तज्ज्ञ सांगतात, की एखादी व्यक्ती गरीब असणे म्हणजे केवळ दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणे असे नाही तर शिक्षण, आरोग्य, निवारा, कुटुंब, न्याय, समुदाय सहाय्य, जमीन, पत, संधी आणि क्षमता व इतर घटक यासारख्या भौगोलिक, जैविक आणि सामाजिक उत्पादक संसाधनांचा अभाव असतो. म्हणजेच दर दिवसाला दोन डॉलर्स किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न पातळी असते. कुपोषण, बेरोजगारी, विषमता असे बरेच घटक दारिद्र्यामध्ये भर टाकतात. त्यामुळे दारिद्र्य ही एक गुंतागुंतीची समस्या असल्याचे दिसते.

समताधिष्ठित विकास हाच मार्ग विकसित देशामध्ये दारिद्र्य व विषमता कमी होण्याची प्रवृत्ती असली तरी अद्यापही बहुसंख्य विकसनशील देशांत विकासाच्या वाढीबरोबरच दारिद्र्यही वाढते आहे. शिवाय कोरोना महामारीमुळे अर्थव्यवस्थेतील देवाण घेवाण ठप्प झाल्यामुळे कोट्यवधी लोकांचे रोजगार हिरावले गेले आहेत. त्यांच्या उत्पन्नावर नकारात्मक परिणाम झाला आहे. ही बाब बहुतांश नागरिकांना पुन्हा गरिबीत ढकलणारी ठरते. या पार्श्वभूमीवर भविष्यकाळाचा विचार करता वाढत्या उत्पन्न विषमतेतून दारिद्र्यही वाढेल हे उघडच आहे. या सर्व बाबी विचारात घेता समाजातील वंचित, गरीब, दुर्लक्षितांना समान संधी देणाऱ्या सर्वसमावेशक, समताधिष्ठित विकासाचा मार्ग अवलंबावा लागेल. त्यासाठी वाढत्या श्रमशक्तीच्या तुलनेत अधिक वेगाने रोजगार संधी निर्माण कराव्या लागतील.

# दत्तात्रेय विसवळे हे माजलगाव विधानसभा लढणारच...



**माजलगाव प्रतिनिध**

माजलगाव तालुक्यातील धडाडीचे, सर्वसामान्यांचे नेते म्हणून ओळख असलेले मा.दत्ता विसवळे माजलगाव मतदार संघात सध्या विधानसभेसाठी तयारी करत असून येत्या काळात ते आमदार दिसतील असे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे व प्रस्थापिटतासाठी पितासाठी नव्हे तर लोकशाहीत सर्वांना मुभाअसते राजकीय मक्तेदारी मोडीत काढावी लागेल त्यामुळे मी माजलगाव विधानसभा लढणारच असे मत व्यक्त नेते दत्तात्रेय विसवळे यांनी केले आहे. प्रसंगी घुसखोरावर मात करून गरुड भरारी घ्यावी लागते. माजलगाव मतदार संघाचा पल्ला गाठण्यासाठी दत्ता विसवळे यांची पुरेपूर तयारी झाली आहे. व सर्वसामान्य जनतेची नाळ जोडली आहे. मतदार खुल्या मनाने बोलत नसला तरी निवडणुकीच्या रंणधूमाळीत भय मुक्तीसाठी दत्ता विसावळे यांना माजलगाव मतदार संघातील मतदार राजा बिनधास्त मतदान करेल.

# सुषमा अंधारेंची पोस्ट, बदामरावांच्या गाठीभेटी व लक्ष्मण पवार यांची चुप्पी ने संभ्रम कायम

## आ.लक्ष्मण पवार यांच्या राजकिय कोंडीने कार्यकर्ते हवालदील

बीड - गेवराई विधानसभा क्षेत्रातील भाजपा आमदार लक्ष्मण पवार यांनी आगामी विधानसभा निवडणूक ही भाजप पक्षाकडून लढविणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिले असतांना त्यांचा शरद पवार गटातील प्रवेशाचा मार्गही अडविण्यात आल्याची चर्चा राजकिय वर्तूळात सुरु आहे त्यातच माजी मंत्री बदामराव पंडीत यांनीही शिवसेना उबाटा गटाकडून आपणच उमेदवार असल्याचे सांगत मतदार संघात भेटीगाठीचा कार्यक्रम घेतला तसेच सुशमा अंधारे यांनीही महाविकास आघाडीचे बदामराव पंडीत हेच उमेदवार असल्याचे सोशलल मिडीया पोस्ट केली यामुळे ऐन निवडणूकीच्या तोंडावर लक्ष्मण पवार यांची राजकीय कोंडी झाली आहे. ही राजकीय कोंडी फोडण्यासाठी आता शेवटच्या क्षणी लक्ष्मण पवार हे महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविणार या चर्चांना पुर्णविराम मीळतो की काय ? अशी संभ्रमावस्था मतदार संघात वेग धरू लागली आहे मात्र या चर्चांमुळे लक्ष्मण पवार समर्थक हवालदील झाल्याचे दिसत आहे.

महायुतीत गेवराईची जागा २०१४ व २०१९ असे दोन टर्म लक्ष्मण पवार यांनी भाजपाकडून जींकली मात्र



गत काही महिन्यापासून सत्ताधारी आमदार असूनही पालकमंत्र्यांकडून विकास कामात डावलले जात असल्याचा आरोप करीत निवडणुकीतून माघार घेत असल्याचे जाहिर करून गुगली टाकली होती मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर पुन्हा निवडणुकीच्या मैदानात शरद पवार गटाकडून उतरण्याचा निर्णय लक्ष्मण पवार यांनी घेतल्याचे सांगीतले जात होते मात्र गुरुवार रोजी शिवसेना उबाटा गटाचे उपनेत्या सुषमा आंधारे यांनी महाविकास आघाडीचे गेवराई मतदार संघाचे उमेदवार माजी मंत्री बदामराव पंडीत हेच असल्याचे सोशल मिडीयावर ठणकावुन सांगीतल्याने पुन्हा संभ्रम निर्माण झाला आहे, महायुतीचा उमेदवार स्पष्ट असताना महाविकास आघाडीचा उमेदवार बाबत मात्र पेच निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. जागा वाटपात गेवराईची जागा महाविकास आघाडीत कोणाच्या वाट्याला जाते यावर मतदार संघाचे गणीत ठरणार आहे.गेवराई मतदार संघात राष्ट्रवादी कॉंग्रेस व भाजपाची मोठी व्होटबॅंक असून राजकीय पाया मजबूत आहे असे असतांना लक्ष्मण पवार यांनी थेट शरद पवार गटाकडे पसंती दर्शविली असल्याने अनेकांच्या भूवया उंचावल्या होत्या. राष्ट्रवादी कॉंग्रेस व शिवसेना उबाटा गेवराई विधानसभा क्षेत्रातून उमेदवार लढविण्याचा निर्धार केला असल्याने या क्षेत्राचे विद्यमान आमदार लक्ष्मण पवार यांच्यासाठी राजकीय कोंडी झाली आहे. ही कोंडी फोडण्यासाठीच आता महाविकास आघाडीत खलबते सुरू असल्याची चर्चा मतदार संघात सुरू झाली आहे.

# आर्ट गॅलरीच्या वर्धापन दिना निमित्त महिला जागर व मतदान जागृती व्यंगचित्र प्रदर्शन कार्यक्रम संपन्न

बीड प्रतिनीधी - बीड येथील विश्वविक्रमी व्यंगचित्रकार आयुमंर्गलम निवासी मुक बधीर विद्यालयाचे शिक्षक श्री.सुहास पालीमकर यांनी उभारलेल्या व्यंगचित्र आर्ट गॅलरीच्या तिसऱ्या वर्धापन दिना निमित्त व बीड जिल्ह्याचे नाव दिनांक 17.10.2013 रोजी गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व वेब बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये स्त्रीभ्रुण हत्या या विषयी 628 फुट लांबीची व्यंगचित्र पट्टीची नोंद झाल्याच्या घटनेस 11 वर्षे पुर्ण झाल्याचे औचित्य साधून महिला जागर व मतदान जनजागृती या विषयी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून बीड मधील प्रसिध्द मा.डॉ.सीमा सुभाष जोशी, मा.डॉ.सुनिता अनिल बारकुल, मा.श्रीमती वर्षा गाडे मॅडम (पोलीस निरीक्षक भरोसा सेल) मा.प्रा.ज्योती विनोद मुळूक, मा.श्री.परमेश्वर सानप (पो.उ.नि.) हे उपस्थित होते. यावेळी डॉ.सौ.सीमा जोशी म्हणाल्या की व्यंगचित्र माध्यम हे एक वेगळे माध्यम असून या माध्यमातून विविध उपक्रम



योजनांची जनजागृती उत्तम प्रकारे होते. पालिमकरांच्या विश्वविक्रमा वेळी आम्ही उपस्थित होतो. तसेच नवरात्री निमित्त महिला जागर उपक्रमास शुभेच्छा दिल्या. मा.डॉ.सौ.सुनिता बारकुल म्हणाल्या की, व्यंगचित्राचे विषय त्यावरील कॅप्शन आणि त्यावरील चित्रे यामुळे प्रभावी होतात. पालीमकरांच्या व्यंगचित्रातून या तिन्ही गोष्टींचा उपयोग योग्य रितीने केलेला आहे. त्यामुळे भावना विषय व्यक्त होतो. पो.नि. मा.श्रीमती वर्षा गाडे म्हणाल्या की, पालीमकरांच्या व्यंगचित्राचे विषय हे उद्बोधक, आशयदर्शक असतात. प्रा.सौ.ज्योती मुळूक म्हणाल्या की, पालीमकरांचे कार्य सातत्य हे मी बालपणापासून पाहत आहे ते आम्हाला प्रोत्साहन व प्रेरणा देते. पालीमकर सर यांच्या पत्नी सौ.ज्योती पालीमकर यांनी आमचे सर्व कुटूंब सरांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. त्यांचे अविरत अथक परिश्रम आम्हाला व भावी पिढीला प्रेरणादायी आहे अशा शब्दात त्यांच्या भावना व्यक्त केल्या. सरांचे कार्य पाहुन मुलगी स्नेहा सुहास पालीमकर (मुळे) हिने पण तांदूळावर छत्रपती शिवाजी महाराज यांचे चित्र रेखाटून विश्वविक्रम केल्याची माहिती सांगितली.

या कार्यक्रम प्रसंगी ह.भ.प.भास्कर महाराज जोशी, मा.श्री. भास्करराव तुपसमुद्रे, श्री.भुजबळ सर, श्री.मिसाळ सर, टाकणखार मॅडम, समाजसेवक प्रविण पालीमकर, सौ.प्रणिता प्रविण पालीमकर,रूग्णसेवक शरद झोडगे,साम टिव्हीचे श्री.जीरे सर, सौ.रंजनी भास्करराव जोशी श्री.मुंडे साहेब आदि मान्यवरांसह आनंदवाडी ग्रामस्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ.स्वाती निलेश सर्वज्ञ यांनी केले.

# लाडकी बहीण योजनेचे पैसे परस्पर काढून फसवणूक करणाऱ्यावर गुन्हा दाखल करा.
## (लाडकी बहीणीने जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले निवेदन)

बीड- (प्रतिनिधी) मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे परस्पर अँपद्वारे काढून इरफान बाबू शेख यांने सबियाची फसवणूक केली आहे. सदरील प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, पती,सासू व दिर यांनी संगणमत करून दोन लाख रुपयांसाठी सबियावर जवळ-पास अडीच वर्ष प्रचंड जाच जुलूम केले असून तिचा अनन्वित शारीरिक व मानसिक छळ केला आहे.आणि ती गर्भवती असताना तिला रात्रीच्या वेळी घरात कोंडून तिच्या पोटात,पाठीत व डोक्यात मारले आहे. आणि इरफानने तिच्या हातावर ब्लेड मारून जीवे मारण्याचा प्रयत्न केला असून ती गर्भवती असताना तिच्या पोटावर लोखंडी पाईपने मारहाण केली आहे. सबियाला पती,सासू व दिर यांनी अमानुषपणे मारहाण केल्यामुळे तिचा जिल्हा रुग्णालय,बीड येथे गर्भपात झाला असून, सासरच्या लोकांनी "भ्रूण हत्या" केली आहे. सासरच्या लोकांवर शिवाजीनगर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला असून सदरील प्रकरण माननीय न्यायालयात न्याय प्रविष्ट आहे सबियाला पती व सासूने अर्वाच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देऊन घराबाहेर हाकलून दिल्यामुळे ती मजबूरीने एक वर्षाच्या लहान मुलासह माहेरी मामा व आजीच्या घरी राहत असून आजी तिचा सांभाळ करीत होती परंतू आजीचे निधन झाल्यामुळे ती दुःखी- कष्टी जीवन जगत असून तिच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न बिकट झाला आहे. सबियाला लाडकी बहीण योजनेमध्ये आशेचा किरण दिसल्यामुळे तिने अर्ज दाखल केला असता तिचा अर्ज मंजूर होऊन मुख्य डाकघर, बीड मधील तिच्या खात्यात पैसे जमा झाले.परंतू ती पैसे काढण्यासाठी गेली असता लाडकी बहीण योजनेचे तीन हजार रुपये परस्पर अँपद्वारे इरफानने काढले आहे.असे तिला समजले. इरफान हा पैशाचा लालची असून त्याचेवर यापूर्वी दोन लाख रुपयांसाठी सबियाचा छळ केल्यामुळे आणि गर्भपातास कारणीभूत असल्यामुळे गुन्हा दाखल झालेला असताना आणि सदरील प्रकरण माननीय न्यायालयात न्यायप्रविष्ट असताना सुद्धा जाणीवपूर्वक इरफानने लाडकी बहीण योजनेचे शासनाने दिलेले पैसे परस्पर अँप द्वारे काढून सबियाची फसवणूक केली आहे. तरी इरफान बाबू शेख रा. चाऊस गल्ली, बालेपिर बीड याचेवर तात्काळ गुन्हा दाखल करावा अशी विनंती सबियाने माननीय जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना केली आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १९ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# माजलगाव मतदार संघातील बेरोजगारी घराणेशाही हद्दपार करण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरतोय-दत्ता वाकसे

बीड/प्रतिनिधी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य गोरगरीब कष्टकरी कामगार दिनदलित यांच्या न्याय हक्कासाठी बेरोजगारी हद्दपार करण्यासाठी घराणेशाही हद्दपार करण्यासाठी माजलगाव मतदारसंघातील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी रिंगणात उतरतोय माझ्यासारखा चळवळीतील सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला सामान्य जनतेने न्याय द्यावा असे आव्हान शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केले आहे पुढे ते म्हणाले की माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये गेल्या अनेक वर्षापासून घराणेशाही बेरोजगारी व गुंडशाही हद्दपार करून सर्वसामान्य माणसाला स्वाभिमानाने जगण्यासाठी स्वाभिमानाने मान उंचावण्यासाठी काम करणार आहे माजलगाव मतदारसंघातील विविध विकास कामे आणखीही विकासापासून दूर आहेत माजलगाव मतदार संघातील वाड्यावरस्त्यावरील रस्त्याला अक्षरशा चाळणी झालेली आहे चिखल तोडीत जावे लागते त्यामुळे या मतदारसंघाला एक सुशिक्षित अनेक आदर्श आणि सर्वसामान्य प्रश्न सोडवण्यासाठी मी कार्यतत्पर राहणार आहे त्यामुळे माजलगाव मतदार संघातील सामान्य जनतेने आता मला न्याय दिला पाहिजे माजलगाव मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली असून युवक हे व्यसनाधीन झालेले आहेत आणि त्यांना व्यसनापासून दूर करून उद्योग व्यवसायामध्ये प्रगतशील करण्यासाठी मी काम करणार आहे आज परिस्थिती पाहिली तर माजलगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये खड्ड्यात रस्ता की

**काहींनी बँका लुटल्या तर काहींनी तेलात भेसळ केली.. माजलगाव विधानसभा मतदारसंघातील काही लोकांनी गोरगरीब कष्टकरी कामगार यांच्या हक्काची बँक असलेल्या डीसीसी बँक लुटून स्वतःचे घर भरले आहे तर काही तेलाच्या कंपन्या टाकून भेसळ करून लोकांच्या जीवनाशी खेळत आहेत त्यामुळे असल्या लोकांना जनतेने थारा देऊ नये सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी आणि कायम स्वाभिमानाने काम करत आहोत कुठल्याही प्रकारचा डाग आमच्यावर नाही असे देखील वाकसे यांनी म्हटले आहे**



रस्त्यात खड्डा ही अवस्था झालेली आहे त्यामुळे आता मात्र जनतेने बदल घडवला पाहिजे आणि त्यासाठी मी कार्यतत्पर असून सामाजिक विषयाला अनुसरून मी गेल्या वीस वर्षापासून काम करत आहे माजलगाव मतदारसंघातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मी चोवीस तास उपलब्ध राहणार आहे त्यामुळे माजलगाव मतदार संघातील सुज्ञ मतदार राजाने मला न्याय द्यावा अशी आव्हानही शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केले आहे

## माजलगाव येथे नशामुक्ती अभियान शिबिरात २३० रोगांची मोफत तपासनी व औषधी उपचार

### ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम माजलगावचा सामाजिक उपक्रम

माजलगाव -माजलगांव येथे ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम माजलगाव युनिटने शनिवारी दि. 12 ऑक्टोबर रोजी आयोजित मोफत नशामुक्ती अभियान शिबिरात 230 जणांची तपासणी करण्यात आली हयात रुग्णांना मोफत औषधी उपचार करुन सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. माजलगाव येथील जुना बाजार रोड ,जुनी नगरपालिका येथे सकाळी ११ ते दुपारी ४ वा.पर्येंत नशामुक्ती अभियान शिबिरात माजलगावकरांनी उत्कर्ष प्रतिसाद दिला.



ह्यावेळी शिबिरात २३० रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी,मार्गदर्शन व मोफत औषधी उपचार करण्यात आले.हया शिबिरात बीड शहरातील मनोपचारतज्ज्ञ डॉ.मोमीन मुजाहेद,डॉ.स्वामी साहेब व त्यांची टिम उपस्थित होती तसेच हया कार्यक्रमात माजलगाव शहर पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ साहेब यांनी उपस्थित राहुन मार्गदर्शन केले. नशामुक्ती अभियान शिबिरात सर्वप्रकारच्या व्यसनावर मार्गदर्शन करुन मोफत तपासणी, औषधी उपचार करण्यात आले.

ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम माजलगावचे मौलाना माजिद साहब नदवी, मुफ्ती शब्बीर साहब,मुफ्ती अय्यूब साहब,हाफ़िज़ अब्दुल रहीम साहब, मौलाना कलीम साहब,मौलाना वहीद, हाफिज उमेर, हाफिज दाऊद साहेब,,सय्यद सज्जाद राज, वसीम अत्तार, शेख साहील,जुनेद पठाण सर, फारुक अण्णा ,शेख अजहर,मोमीन ओवाईस,शेख शकील यांनी विशेष परिश्रम करुन हि शिबिर यशस्वी केले तसेच दुसरा टप्पा नशामुक्ती अभियान शिबिर दि.२०/१०/२०२४ रोजी स. ११.०० ते २.०० वेळी जुनी नगरपालिका समोर आयोजित करण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी अशी माहिती ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम माजलगाव पदाधिकारींनी दिली.

## प्रख्यात साहित्यिक कविवर्य डॉ.अशोक शिरसाट यांची कविता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात बी.ए. भाग -3 मराठीच्या पाठ्यपुस्तकांत-अभ्यासक्रमांत सामाविष्ट



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात बी.ए. भाग -३ च्या मराठी पाठ्य पुस्तकांत अभ्यासक्रमांत 'बाबा ' ही कविता सामाविष्ट झाल्याबद्दल अमरावती येथील जेष्ठ विधिज्ञ अॅड. राजकुमार मोरस्कर साहेब यांनी कविवर्य डॉ.अशोक शिरसाट यांचे मनःपूर्वक स्वागत केले. याप्रसंगी सन्मानीय वकिल मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती. या प्रसंगी कविता सामाविष्ट असलेली बी.ए. भाग -३ ची पाठ्यपुस्तकें उपस्थित मान्यवर वकिल मंडळी यांना सस्नेह भेट देण्यांत आली. मा.अॅड. राजकुमार मोरस्कर साहेब यांनी 'बाबा ' ही कविता त्यांचे दालनातच वाचून दाखविली व सर्वांना मंत्रमुग्ध केले. डॉ. अशोक शिरसाट यांनी यावेळी पेढे वाटप करून , सर्वांचे मनापासून आभार मानले.

## शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे विविध पुरस्कार विविध नावांनी जाहीर

उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर चे तापी पूर्णा राज्यस्तरीय साहित्य व इतर पुरस्कार विविध संमेलनामध्ये प्रदान केले जातात हे पुरस्कार फाउंडेशनचे आयोजित संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या 750 व्या जयंती महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज साहित्य नगरी आळंदी देवाची येथे 14 डिसेंबर 2024 रोज शनिवारला आयोजित तिसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलनात दिले जाणारे फाउंडेशनचे विविध पुरस्कार पुढील नावांनी दिले जातील ते पुरस्कार फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी नुकतेच झूम मीटिंग द्वारे जाहीर केले ते पुढील प्रमाणे आहेत तापी पूर्णा राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार पुरस्काराचे स्वरूप 2100 रुपये रोख मानपत्र व स्मृतीचिन्ह आणि गुलाब पुष्प असे आहे एक नामदेवराव मुकुंदराव खेडकर स्मृती प्रित्यर्थ हा पुरस्कार दिला जाईल या पुरस्काराचे सौजन्य श्री केशवराव नामदेव खेडकर अकोला यांचे आहे आणि दुसरा पुरस्कार तापी पूर्णा राज्यस्तरीय रामपुरी गणेशपुरी गोसावी जीवनगौरव पुरस्कार या नावाने दिला जाईल या पुरस्काराचे सौजन्य श्री मनोहरपुरी रामपुरी गोसावी नाशिक यांचे आहे तसेच आदिशक्ती संत मुक्ताई अध्यात्म सेवा पुरस्कार 2100, रुपये रोख मानपत्र, स्मृतिचिन्ह व गुलाब पुष्प असे या पुरस्काराचे स्वरूप असून हा पुरस्कार जानकीबाई रामचंद्रराव कुलकर्णी इर्लेकर ता. जिल्हा धाराशिव यांच्या नावे दिला जाईल त्याचप्रमाणे तापी पूर्णा राज्यस्तरीय उत्कृष्ट कला पुरस्कार कै. सतीश किसनराव वराडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ या पुरस्काराचे स्वरूप 1100 रुपये रोख प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व गुलाब पुष्प असे आहे या पुरस्काराचे सौजन्य श्रीमती अर्चना सतीश वराडे मुक्ताईनगर यांचे आहे या नावाने तीन पुरस्कार दिले जातील. त्याचप्रमाणे तापी पूर्णा राज्यस्तरीय उत्कृष्ट समाजसेवा पुरस्कार एकूण पाच पुरस्कार कै. डॉ. रमाकांत शुरपाटणे स्मृती पुरस्कार यांच्या नावे 1100 रुपये रोख प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व गुलाब पुष्प असे दिले जातील या पुरस्काराचे सौजन्य त्यांचे चिरंजीव श्री वेदांत रमाकांत शुरपाटणे चिखलदरा जिल्हा अमरावती यांचे आहे असे हे पुरस्कार विविध नावांनी आळंदी येथील संमेलनापासून दिले जातील असे शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शिवचरण उज्जैनकर यांनी झूम मीटिंग द्वारे नुकतेच जाहीर केले. याप्रसंगी फाउंडेशन ची महाराष्ट्र राज्य कार्यकारणीचे पदाधिकारी विविध विभागीय कार्यकारणीतील पदाधिकारी त्याचप्रमाणे विविध जिल्हा कार्यकरिणीचे पदाधिकारी आणि गोवा राज्य कार्यकारिणीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मतदानासाठी मतदार यादीत नाव आवश्यक नाव नोंदणी करण्यासाठी १९ ऑक्टोबर पर्यंत अंतिम मुदत

### - मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम

मुंबई, दि. १७ : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असून दि. २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील एकूण 288 विधानसभा मतदारसंघात एकाच टप्प्यात मतदान घेणार आहे. या निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट असणे आवश्यक आहे, ज्यांनी आपले नाव मतदार यादीत अद्याप समाविष्ट केलेले नाही त्यांना अजूनही दि. १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मतदार यादीत आपले नाव नोंदवण्याची संधी आहे, तरी आपले नाव आर्वजून मतदार यादीत समाविष्ट झाले असल्याची खात्री प्रत्येक मतदाराने करावी. तसेच ज्यांनी अजून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट केले नाही त्यांनी तातडीने १९ ऑक्टोबरच्या आत आपले नाव मतदार यादीत नोंदवावे, जेणेकरुन मतदानाच्या दिवशी मतदानाचा आपला हक्क मतदारांना बजावता येईल, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांनी केले.

अजूनही ज्यांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवलेले नाही त्यांना दि. १९ ऑक्टोबर रोजी रात्री पर्यंत ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने मतदार यादीत नाव नोंदणी करण्याची संधी उपलब्ध असून निरंतर मतदार नोंदणीचा कार्यक्रम अद्याप सुरु आहे. त्यामुळे ज्या पात्र नागरिकांची आतापर्यंत मतदार नोंदणी झालेली नाही, अशा नागरिकांकडून उमेदवारांचे नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या १० दिवस अगोदरपर्यंत म्हणजेच दि. 19.10.2024 पर्यंत प्राप्त झालेले अर्ज क्र. ६ मतदार यादीमध्ये नोंद घेण्यासाठी विचारात घेण्यात येतील. तरी या संधीचा लाभ घेऊन सर्व पात्र नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करत मतदानाचा आपला हक्क आर्वजून बजावावा, तसेच सर्व मतदारांनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट असल्याची खात्री तातडीने करुन घ्यावी, असे आवाहन श्री.चोक्कलिंगम यांनी केले आहे.

# पाटोदा व नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर युनिट सुरू करा ;

### डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना निवेदन:- डॉ.गणेश ढवळे

\- - - -

बीड:- ( दि.१८ ) पाटोदा तालुक्यातील पाटोदा ग्रामीण रुग्णालय आणि बीड तालुक्यातील नेकनुर स्त्री व कुटीर रूग्णालय येथे ट्रॉमा केअर सेंटरची अत्यावश्यकता असुन तातडीने सुरू करण्यात यावे. अहमदपूर ते अहमदनगर आणि पैठण ते पंढरपूर दोन राष्ट्रीय महामार्गावरील अतिवेगाने वाहन चालवणे त्याच बरोबर उखडलेले रस्ते आणि रखडलेल्या कामांमुळे वाढत्या अपघातांची संख्या पाहता तातडीने उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना जीव गमवावे लागत असुन तातडीने पाटोदा आणि नेकनुर याठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे , शेख युनुस,स्वप्निल गलधर, निळकंठ वडमारे, विजय लव्हाळे, शेख मुबीन यांनी डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी डॉ.अशोक थोरात यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने प्रस्ताव पाठवण्याचे आश्वासन दिले.

पाटोदा ग्रामीण रुग्णालय येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे

\- - -

पाटोदा तालुका हा दुष्काळी आणि ऊसतोड मजुरांचा तालुका असुन तीन तालुक्यांचे मध्यवर्ती ठिकाण आहे. अहमदपूर ते अहमदनगर आणि पैठण ते पंढरपूर असे दोन राष्ट्रीय महामार्ग तालुक्यातुन जातात.वेगाने वाहने चालविणे तसेच जागोजागी उखडलेले आणि रखडलेले रस्त्यांचे काम यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असुन तातडीने उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना आपले जीव गमवावे लागत आहेत.पाटोदा ग्रामीण रुग्णालयात दररोज ३०० रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. याठीकाणी सुसज्ज इमारत असुन शस्त्रक्रियेसह इतर सुविधा उपलब्ध आहेत.मात्र ट्रॉमा केअर युनिटची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. आष्टी व शिरूर या दोन्ही तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी ट्रॉमा केअर युनिटची सुविधा उपलब्ध असून



केवळ पाटोदा तालुक्यातील ग्रामस्थ यापासून वंचित आहेत.हा पाटोदा तालुक्यातील ग्रामस्थांवर अन्याय आहे. त्यामुळे पाटोदा ग्रामीण रुग्णालय येथे ट्रॉमा केअर निर्मिती करून सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. अशी मागणी करण्यात आली आहे.

ट्रॉमा केअर सेंटर मध्ये उपलब्ध सुविधा; दर्जेदार उपचार होण्यास मदत

\- - -

ट्रॉमा केअर सेंटर सुविधा उपलब्ध झाल्यानंतर त्याठिकाणी सिटीस्कॅन मशीन,एसीजी हाडाचे ऑपरेशन, २ आर्थिफिजिशियन, भुलतज्ञ,२ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती झाल्याने तातडीने आणि दर्जेदार उपचार होण्यास मदत होणार आहे.

गेल्यावर्षी पाटोदा ग्रामीण रुग्णालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते. :- डॉ.गणेश ढवळे

\- - -

पाटोदा ग्रामीण रुग्णालय येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि त्यांचे सहकारी तथा पत्रकार शेख जावेद, हमीद खान पठाण, महादेव नागरगोजे,पवन अडागळे, भगवान जावळे, राहुल जाधव, रामदास भाकरे,गौतम जावळे, रमेश दळगडे, गणेश रणदिवे यांनी दि.०५ ऑक्टोबर रोजी पाटोदा ग्रामीण रुग्णालय येथे धरणे आंदोलन केले होते.तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ.सदाशिव राऊत यांनी तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुरेश साबळे यांना धरणे आंदोलनाच्या अनुषंगाने लेखी पत्र दिले होते.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर मो.नं.८१८०९२७५७२

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

शनिवार १९ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# विधानसभेत किती पाडणार?

# उद्या २० तारखेला ठरणार

## जरांगे पाटील २० तारखेला ठरवणार आहेत की, पाडापाडी करायची की निवडणूक लढवायची.



पाडापाडी करणार की विधानसभा निवडणुकीत उमेदवार देवून निवडणूक लढणार याचा फैसला, जरांगे पाटील 20 तारखेला घेणार आहेत. त्यासाठी मराठा बांधवांना त्यांनी 20 तारखेला अंतरवाली सराटीला बोलावलं आहे. मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा फडणवीसांवर शिंदेंना आरक्षण देण्यापासून रोखल्याचा आरोप केला आहे. मराठ्यांना मुख्यमंत्री शिंदेंना आरक्षण द्यायचंच आहे, मात्र फडणवीसांनी रोखल्याचं जरांगे म्हणाले आहेत. तर, अधिकार मुख्यमंत्र्यांनाच असताना फडणवीसच टार्गेट का ?, शिंदेंवर का बोलत नाही असा सवाल मंत्री गिरीश महाजनांनी केला आहे.

इकडे मुख्यमंत्र्यांनी महायुती सरकारनं मराठा समाजासाठी काय काय केलं, हे पाहावं. ज्यांनी काहीच दिलं नाही त्यांचा जरांगेंनी निवडणुकीत विचार केला पाहिजे, असं मुख्यमंत्री म्हणाले आहेत. परिवर्तन महाशक्ती आघाडीच्या संभाजी राजेंनी जरांगेंना सोबत येण्याची ऑफर दिली आहे. मनोज जरांगे यांनी एक तर सोबत यावं किंवा उमेदवार तरी द्यावेत असं संभाजीराजे म्हणाले आहेत.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीचा विचार केला तर, मराठवाड्यात 8 पैकी 7 लोकसभा मतदारसंघात जरांगेंना फॅक्टर दिसला. जालन्यात काँग्रेसचे कल्याण काळे विजयी झालेत. भाजपचे केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे पराभूत झाले. बीडमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे बजरंग सोनावणे विजयी झाले. पंकजा मुंडे पराभूत झाल्या, लातूरमध्ये काँग्रेसचे शिवाजी काळगे विजयी झाले, भाजपच्या सुधाकर श्रृंगारेंचा पराभव झाला. नांदेडमध्ये काँग्रेसचे वसंत राव चव्हाण विजयी झाले तर भाजपचे प्रतापराव चिखलीकरांचा पराभव झाला.

परभणीत ठाकरेंच्या शिवसेनेचे संजय जाधव विजयी झालेत... महायुतीचे महादेव जानकर पराभूत झाले. हिंगोलीत ठाकरेंच्या शिवसेनेचे नागेश पाटील आष्टीकर विजयी झाले आणि शिंदेंच्या शिवसेनेचे बाबूराव कोहळीकर पराभूत झाले. धाराशीवमध्ये ठाकरेंच्या शिवसेनेचे ओमराजे निंबाळकर विजय झाले तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या अर्चना पाटलांचा पराभव झाला.

फक्त छत्रपती संभाजीनगर ही एकमेव मराठवाड्यातली जागा आहे जिथं शिंदेंच्या शिवसेनेचे संदीपान भुमरे विजयी झाले आणि MIMचे खासदार इम्तियाज जलील आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे चंद्रकांत खैरे पराभूत झाले. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी जरांगेंची आहे. पण सरसकट मराठा समाजाला ओबीसी करणं शक्य नसल्याचं सरकारनं म्हटलं. त्यामुळं आता लोकसभेप्रमाणं पाडापाडी होणार की स्वत: जरांगे आमदार निवडून आणण्यासाठी उमेदवार देणार हे 20 तारखेला ठरेल.



## उद्याच्या सक्षम समाजासाठी उगवत्या पिढीवर काम करण्याची गरज

ता. 17 चिंचवड : मानवी मनाला घडविण्यासाठी संस्कार हा प्रभावी उपाय आहे. आजची मुले उद्याचा समाज आहेत. त्यामुळे उद्याचा सक्षम समाज घडविण्यासाठी आजपासूनच मुलांच्या मनात संस्कार रुजविले पाहिजे. असे मत अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू यांनी व्यक्त केले. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या चिंचवड शाखेचे उदघाटन राजगुरू यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी, कोषाध्यक्ष संजय ऐलवाड, कार्यकारिणी सदस्य श्रीकांत चौगुले, चिंचवड शाखेचे अध्यक्ष दीपक पागे, प्रियांका नलावडे, शलाका पागे आदी उपस्थित होते. राजगुरू म्हणाले, "आजचा समाज अत्याचारी का बनला आहे? असा समाज का निर्माण झाला? याचे उत्तर प्रदूषित वातावरणात उत्तम संस्काराचा अभाव असेच आहे. आता मने बोथट झालेल्या मोठ्या माणसांवर संस्कार रुजत नाहीत, मात्र आपल्या हातात असलेल्या नव्या पिढीवर नक्कीच चांगले संस्कार करता येतील. त्यामुळे चांगल्या समाज निर्मितीसाठी मुलांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. हेच काम बालकुमार संस्था करत आहे. मुळात बालकांचा सर्वांगीण विकास करण्याचा वसाच या संस्थेने घेतला आहे. या कामात सर्वांनी सहभागी व्हावे." असेही माधव राजगुरू यांनी सांगितले. अनिल कुलकर्णी यांनी संस्थेची माहिती दिली. संजय ऐलवाड यांनी मनोगत व्यक्त केले. दीपक पागे यांनी प्रास्ताविक केले. मधुरा पागे व आरोही देशपांडे बालकवयित्रींनी स्वरचित कविता सादर केल्या. प्रज्ञा देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले, मंगेश उंबराणी यांनी आभार मानले.

# जगतापवाडी शाळेत विद्यार्थ्यांनी घेतली सर्पमित्राची मुलाखत

## उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना मीना अशोक म्हसे यांनी मार्गदर्शन केले.

दैनिक लोकआरंभ//

ता. 18 पुणे प्रतिनिधी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जगतापवाडी येथे परिसरातील प्रेरणादायी व्यक्तींच्या मुलाखती या उपक्रमांतर्गत शाळेतील राजवीर मंगेश जगताप व स्पृहा प्रदीप गायकवाड विद्यार्थ्यांनी सर्पमित्र शुभम सर व शेरखान शेख यांची मुलाखत घेतली. सर्पमित्रांना प्रश्न विचारून विद्यार्थ्यांनी सापांविषयी समज गैरसमज यावेळी जाणून घेतले. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना मीना अशोक म्हसे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जगतापवाडी



येथे उपक्रमशील शिक्षिका मीना म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली राजवीर मंगेश जगताप व स्पृहा प्रदीप गायकवाड या विद्यार्थ्यांनी परिसरातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांच्या मुलाखती या उपक्रमांतर्गत सर्पमित्र शुभम सर व शेरखान शेख यांच्या मुलाखती घेऊन त्यांना सापांविषयी वेगवेगळ्या शंका विचारल्या. त्या सर्व प्रश्नांची उत्तरे सर्पमित्रांनी देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. सापांच्या प्रजननाची पद्धत, सापांच्या सवयी, सापाबद्दल समाजात असलेली अंधश्रद्धा यांविषयी सर्पमित्रांनी प्रकाश टाकत त्यांना अधिक माहिती देत त्यांची त्यांच्या बाबत असलेली भीती घालवली. याशिवाय परिसरात बिबट्याचा वाढलेला वावर पाहून बिबट्या विषयी माहिती देत त्यांच्या विषयी जनजागृती निर्माण केली.

यावेळी कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अभिजीत जगताप, माजी उपसरपंच मोहन शिंदे ,रमेश देवकर, चेअरमन नवनाथ जगताप, सागर देवकर, अक्षय जगताप, आप्पासाहेब जगताप, राजेंद्र भोसले, माजी अध्यक्ष राहुल जगताप, सत्यवान जगताप, अनिल जगताप,सागर जगताप, गणेश मेमाणे, शरद जगताप, घनश्याम जगताप,नितीन शिंदे, दीपक शिंदे ,सिद्धार्थ शिंदे, रमेश देवकर सत्यवान जगताप, शरद जगताप,सुभाष जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापिका मधुबाला वेताळ, उपक्रमशील शिक्षिका व औषधी वनस्पती पुस्तकाच्या संपादिका मीना म्हसे, उपशिक्षक काशिनाथ डफळ व अंगणवाडी ताई व मदतनीस हे उपस्थित होते.

# द लास्ट टूथ फाउंडेशन कडून संगणकाचे मोफत वाटप

माजलगाव दि.१८ (प्रतिनिधी) दिव्यांग व्यक्तीना स्वतःच्या, सामाजिक व आर्थिक विकासासाठी सामान्य लोकांप्रमाणे संधी मिळत नाही. विविध शासकीय योजना ज्याला गरज आहे अश्या दिव्यांगा पर्यंत पाहोचत नाहीत, त्यामुळे अनेक दिव्यांगांना स्वयंरोजगार करण्याची इच्छा असते परंतु त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे ते शक्य होत नाही. अपंगत्व हा आपल्या जीवनातील सर्वात मोठा अडसर असल्याचे त्यांना वाटते. त्यामुळे ते नैराश्यात जीवन जगत असतात व मिळेल ते काम करून आपला उदरनिर्वाह करतात. द लास्ट टूथ फाउंडेशन चे संस्थापक ऋषीकेश अशोकराव टाकणखार यांनी माजलगाव तालुक्यातील संगणकाचे ज्ञान असलेले, गरजू व होतकरू तरुण-तरुणींचा शोध घेऊन त्यांच्या उपजीविकेचे साधन म्हणून स्वयंरोजगारासाठी डी इ एफ संस्थेच्या अभिषेक सर यांच्या मदतीने मोफत तीन संगणक व दोन झेरॉक्स मशीन हाफत्यावर मिळून दिल्या. माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथील रामदास कदम, सांडस चिंचोली येथील मीरा गिरी व किट्टी आडगाव येथील ऊसतोड मजूर असलेले रामेश्वर वावळकर यांना तीन संगणक व दोन झेरॉक्स मशीन देऊन तीन ऑनलाइन सर्व्हिसेस सेंटर च्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास मदत केली. या सामाजिक कार्यात माजलगाव तालुका व्यापारी महासंघाचे तालुका अध्यक्ष चे मालक सुरेंद्र रेदासनी, बालाजी सुपरमार्केट चे मालक कपिल पगारिया तसेच सुपर कॉम्पुटर चे संचालक देविदास दराडे, अमोल धारक तसेच भारत टाकणखारसर, नितीन काळे यांनी मोलाचे सहकार्य केले. द लास्ट टूथ फाउंडेशनने राबवलेल्या या सामाजिक उपक्रमाचे संपूर्ण जिल्हाभरामध्ये कौतुक होत आहे. आपल्या कोणाकडे चालू स्थितीतील असलेले व वापरात नसलेले संगणक किंवा लॅपटॉप असतील तर संस्थेला दान करावेत जेणेकरून आणखी दिव्यांग व्यक्तींना मदत करता येईल असे आवाहन संस्थेचे सहसचिव प्रा. रमेश टाकणखार सर यांनी केले. संस्थेचे जिल्हा समन्वयक मानव पोटभरे, चेतन निसर्गंध, प्रतिज्ञा तुपारे, अमोल पुंडगे व राहुल दिडवाले यांनी सेंटर स्थापनेत सर्वांना मोलाचे सहकार्य केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com